


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३० । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । मंगळवार २२ /०९/२०२६ । पाने - ६




# चुकीची माहिती पसरवणाऱ्यांचा बंदोबस्त झालाच पाहिजे - माजी मंत्री थोरात

## अमृतवाहिनी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील सहकारी संस्था मोठ्या कष्टातून उभ्या केल्या आहेत. या संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. तालुक्यातील बँका व पतसंस्थांमधून सुमारे ९००० कोटींच्या ठेवी असून हे समृद्धीचे प्रतीक आहे. ते मोडण्यासाठी काही लोक प्रयत्न करत आहेत. म्हणून आपल्या तालुक्याची समृद्ध अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी आपल्या सर्वांना संघर्ष करावा लागणार असून याचबरोबर चुकीचे पसरवणाऱ्यांचा बंदोबस्त झालाच पाहिजे असे प्रतिपादन राज्याचे मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकार महर्षी अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते यावेळी अध्यक्ष स्थानिक चेअरमन सुधाकर जोशी हे होते तर व्यासपीठावर पद्मश्री रघुवीर खेडकर, ॲड माधवराव कानवडे, सौ. दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, बाबा ओहोळ, इंद्रजीत थोरात, शंकरराव खेमनर, व्हा.चेअरमन ॲड. नानासाहेब शिंदे, संचालक किसन सुपेकर, ॲड लक्ष्मण खेमनर, शिवाजी जगताप मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बँकेचे सभासद व महाराष्ट्राचे प्रसिद्ध लोक कलावंत रघुवीर खेडकर यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल त्यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले याचबरोबर बँकेच्या उत्कृष्ट ग्राहकांनाही सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना मा. मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, आपल्या सर्व सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत सुंदर आणि मोठ्या उपस्थितीच्या झाल्या आहेत. संगमनेरचा सहकार आदर्शवत आहे. बँकेचा कारभार हा अत्यंत किचकट आणि अवघड आहे. तरीही अमृतवाहिनी बँकेने अत्यंत चांगले कामकाज करत १२०० कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे.

तालुक्यातील पतसंस्था व बँकांमधून सुमारे ९००० कोटींच्या ठेवी आहेत. ही तालुक्याची आर्थिक समृद्धी आहे. मात्र हे मोडण्यासाठी काही लोक काम करत आहे आणि ते टिकवण्यासाठी आपल्या सगळ्यांना संघर्ष करावा लागणार आहे. भारताची अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारित आहे. जेव्हा शेतीवर ताण पडतो. तेव्हा शेतकरी आत्महत्या करतो. मंदीतही अर्थव्यवस्था टिकून आहे ते शेती व्यवसायामुळे आणि म्हणून शेतकऱ्यांना मदत करताना तातडीने दुष्काळ जाहीर केला पाहिजे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात आपण विना आठ दोन लाखांची कर्जमाफी केली होती. आता महागाई वाढली आहे खतांच्या किमती वाढल्या आहेत .सरकार लाडक्या बहिणींना पैसे देते मात्र दुसऱ्या बाजूला काढून घेते. सध्या दुष्काळाची परिस्थिती असून पिके जळत चालली आहे. पिकांना पाण्याची गरज असताना तालुक्यात विजेचा खेळखंडोबा केला जात आहे. हक्काचे पाणी डोळ्यादेखत पुढे जात आहे. पाणी पुढे गेले तर समृद्धीमुळे म्हणून पाण्यासाठी संघर्ष करावा लागणार असल्याचे ते म्हणाले

तर सुधाकर जोशी म्हणाले की लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली बँकेची उलाढाल बाराशे कोटींची असून एनपीए शून्य टक्के आहे. सर्व आधुनिक व डिजिटल सुविधा नेट बँकिंग बँकेने सुरू केली आहे .कमी जोखीम असलेली बँक म्हणून अमृतवाहिनी बँकेची ओळख असून काही लोक सोशल मीडियाच्या (पान ५)

# विजेच्या खेळखंडोबा विरोधात मंगळवारी जन आक्रोश मोर्चा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुका हा मोठ्या कष्टातून विकसित व वैभवशाली ठरला आहे. मात्र पाणी पुढे नेण्यासाठी विजेचा खेळ खंडोबा केला जात असून हक्काचे पाणी व हक्काची वीज पूर्ण वेळ दाबाने मिळावी याकरता संगमनेर तालुक्यातील शेतकरी व नागरिकांचा भव्य जन आक्रोश मोर्चा मंगळवार दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी स ९ वा. काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ.जयश्रीताई थोरात यांनी दिली.

या मोर्चा बाबत माहिती देताना डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, संगमनेर तालुका हा मोठ्या कष्टातून उभा राहिला आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी भंडारदरा धरणातून तालुक्याला हक्काचे ३० टक्के पाणी मिळवले. दुष्काळी भागासाठी निळवंडे धरण व दोन्ही कालवे पूर्ण केले. आता कालवे पूर्ण होऊन पाणी आले आहे. मात्र विजेचा खेळखंडोबा करून पाणी पुढे नेले जात आहे.

पाणी पुढे नेणे म्हणजे तालुका उध्वस्त करणे आहे. तालुक्यात रात्री सहा ते नऊ या वेळेत लोडशेडिंग सुरू आहे याबाबत आपण वेळोवेळी निवेदने दिली परंतु कोणताही परिणाम झाला नाही आमच्या हक्काची अकरा तास पूर्ण दाबाने वीज व तालुक्याच्या हक्काचे पाणी मिळाले पाहिजे ही आग्रही मागणी सर्वांची आहे आणि त्यासाठी मंगळवार दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता यशोधन कार्यालय प्रांगण येथून प्रांताधिकारी कार्यालयावर भव्य जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

या जन आक्रोश मोर्चामध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात माजी आ. डॉ. सुधीर तांबे,आ. सत्यजित तांबे यांच्यासह सर्वपक्षीय नेते विविध संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते युवक महिला उपस्थित राहणार आहेत. या भव्य जन आक्रोश मोर्चामध्ये तालुक्यातील सर्व युवक नागरिक महिला शेतकरी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. जयश्रीताई थोरात, काँग्रेस पक्ष राष्ट्रवादी, शिवसेना, आरपीआय, पुरोगामी व समविचारी पक्ष विविध सामाजिक संघटना अशा विविध संघटनांनी केले आहे.

# मालपाणी उद्योगसमूहाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीने संगमनेरकर भारावले

## ढोल-ताशांचा निनाद, विविध कलाविष्कारांनी रंगली मिरवणूक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पारंपरिक वाद्यांचा निनाद, ढोल-ताशांचा गजर, आकर्षक कलाविष्कार आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संगमनेर शहरातील वातावरण भक्तिमय झाले. मालपाणी उद्योगसमूहाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य गणेश विसर्जन मिरवणुकीने संगमनेरकरांचे लक्ष वेधून घेतले. या मिरवणुकीत आमदार अमोल खताळ यांनी सहभागी होत कलाकारांचा उत्साह वाढविला.

मालपाणी उद्योगसमूहाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत प्रचार रिक्षा, ढोल-ताशा पथक, लेझीम डान्स, बांबू डान्स, पायरेट डान्स, बगाड यात्रा, साई पालखी, ॲक्रोबॅटिक्स, मँजीका, गोरिला-तात्या विंचू, देवीचा गोंधळ, नरसिंहा, छत्रपती शिवाजी महाराज डान्स, अप्पू राजा डान्स, राधा-कृष्ण डान्स, झुंबा डान्स, हनुमान थीम डान्स, महाकाल नृत्य, अघोरी सादरीकरण, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, वस्त्रहरण, अमृताचा फिरता देखावा आदी विविध आकर्षक कार्यक्रम सादर करण्यात आले.

याशिवाय गणेश रथ, गणेशमूर्ती ट्रॉली, पाणी टँकर आणि स्वच्छता ट्रॉली यांचा मिरवणुकीत समावेश होता. विविध वेशभूषा, नृत्य, पारंपरिक कला आणि देखावे यामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली. रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी करत या कलाविष्कारांचा आनंद घेतला.

मिरवणुकीतील कलाकारांनी सादर केलेल्या विविध कलाविष्कारांचे आमदार अमोल खताळ यांनी कौतुक केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरासोबतच सामाजिक व सांस्कृतिक वारशाचे जतन होते. अशा उपक्रमांमुळे स्थानिक कलाकारांना व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळते, असे त्यांनी सांगितले. (पान २ वर)

### परंपरा पुन्हा सुरू होणे ही आनंदाची बाब – आ. अमोल खताळ

**मालपाणी उद्योगसमूहाच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येणारी गणेश विसर्जन मिरवणूक दोन वर्षांच्या खंडानंतर पुन्हा सुरू झाली, ही आनंदाची बाब आहे. मालपाणी परिवार सामाजिक जाणीवेतून सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, त्यांचे हे कार्य उल्लेखनीय आहे. संगमनेर तालुक्यात परिवर्तनानंतर बंद पडलेल्या अनेक हिंदू धार्मिक परंपरा पुन्हा सुरू झाल्या असून, त्या अविरतपणे सुरू राहाव्यात. धर्मकार्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. गणरायाच्या चरणी प्रार्थना आहे की, सर्वांना सुख, समृद्धी आणि उत्तम आरोग्य लाभो, अशी भावना आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली.**












# दुष्काळाच्या प्रश्नावर किसान सभा आक्रमक

## २३ सप्टेंबरला राज्यभर आंदोलन, संपूर्ण पीक नुकसानभरपाईसह कर्जमाफीच्या मागण्या

संगमनेर - महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि नियमित कर्जदारांच्या प्रश्नावर किसान सभेने आक्रमक भूमिका घेतली असून, २३ सप्टेंबर रोजी राज्यभर आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. राज्यातील प्रत्येक तहसील कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढून शेतकऱ्यांच्या मागण्या सरकारसमोर मांडण्यात येणार आहेत.



सोयाबीन, कापूस तसेच खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी किसान सभेने केली आहे. एनडीआरएफच्या निकषांचा अडसर न ठेवता शेतकऱ्यांना केवळ बियाणे व खतांच्या खर्चापुरती मदत न देता पिकांच्या संपूर्ण नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

नियमित कर्जदार शेतकऱ्यांना किमान दोन लाख रुपये प्रोत्साहन अनुदान द्यावे, विविध कारणांमुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ द्यावा, थकीत उपसा सिंचन योजनांची कर्जे माफ करावीत, तसेच पीक विम्यातून काढून टाकलेले ट्रिगर तातडीने लागू करावेत, अशा मागण्या किसान सभेने केल्या आहेत. याशिवाय गायरान, देवस्थान, वरकस व वनजमिनी शेतकऱ्यांच्या नावे करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, मागील आंदोलनावेळी नियमित कर्जदार आणि दुष्काळाच्या प्रश्नावर

### नियमित कर्जदारांना दोन लाखांचे प्रोत्साहन अनुदान

मुख्यमंत्री यांच्यासोबत किसान सभेच्या शिष्टमंडळाची बैठक घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी आश्वासन देऊनही अद्याप बैठक झालेली नसल्याचा आरोप किसान सभेने केला आहे.

दुष्काळाच्या परिस्थितीत मंत्र्यांकडून दुष्काळ आढावा बैठका घेतल्या जात असताना 'काजू-बदाम' खाण्याचा संदर्भ देत किसान सभेने सरकारच्या भूमिकेवर उपरोधिक टीका केली आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २३ सप्टेंबरच्या आंदोलनात संबंधित मंत्र्यांना काजू आणि बदाम पाठवून निषेध व्यक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२३ सप्टेंबरच्या आंदोलनानंतरही सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर 'वर्षा' बंगल्यावर काजू-बदाम ओतण्याचे आंदोलन करण्याचा इशाराही किसान सभेने दिला आहे.

ही भूमिका किसान सभेचे डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, डॉ. अजित नवले आणि उमेश देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून स्पष्ट केली आहे.

# भाजपचे शेकडो कोटी पाण्यात मोदीच खरे पप्पू - खा. राऊत

मुंबई (वृत्तसंस्था)

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परदेश दौऱ्यात केंद्र सरकारच्या धोरणांवर केलेल्या टिकेवरून सध्या देशातील राजकारण तापले आहे. यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेत भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. राहुल गांधींनी मारलेला बाण भाजपच्या काळजात आरपार घुसला आहे. राहुल गांधींना 'पप्पू' ठरवण्यासाठी या लोकांनी शेकडो कोटी रुपये खर्च केले, पण आता याच राहुल गांधींनी मोदींना 'पप्पू' ठरवले आहे, असा घणाघात राऊत यांनी केला.



राहुल गांधींच्या भूमिकेचे जोरदार समर्थन करताना राऊत म्हणाले, भारताच्या परराष्ट्र धोरणाची सद्यस्थिती काय आहे, हे राहुल गांधी अत्यंत सोप्या शब्दांत जनतेला समजावून सांगत आहेत. मोदींचे विदेश धोरण कसे कोसळले आहे, हे अंधभक्तांनाही आता कळू लागले आहे. याच गोष्टीची देवेंद्र फडणवीस खिल्ली उडवत असतील, तर याचा अर्थ भाजप पूर्णपणे हादरलेला आहे. आता मोदी पप्पू आहेत, राहुल गांधी नाही. राहुल गांधी हे देशाचे नेते आहेत आणि लोक त्यांना मान-सन्मान देतात.पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसाला दिवे पेटवण्याच्या कार्यक्रमाद्दल राऊत यांनी टोला लगावला. शिवाय त्यांच्या कार्यपद्धतीला 'कॉमेडी' म्हटले. पंतप्रधान मोदी लोकसभेत आणि बाहेर पंडित नेहरू, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची नक्कल करत अनेक कॉमेडी प्रकार करत असतात. हा काय प्रकार आहे? देशात दोन जोकर आहेत आणि महाराष्ट्राच्या कॅबिनेटमध्ये तर जोकरांची फौजच आहे. विरोधी पक्षाला उत्तम नट असायलाच लागते. अभिनयाचा ठेका काय फक्त मोदींनीच घेतलाय का? राहुल गांधी, राज ठाकरे, उद्धव ठाकरे, मल्लिकार्जुन खरगे हे सर्वजण उत्तम अभिनय करून जनतेला विषय समजावून सांगू शकतात, असे राऊत म्हणाले. तसेच, फडणवीसांनी संयम ठेवावा, लवकरच त्यांना दिल्लीत जाऊन या सर्व गोष्टींचा सामना करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

युपीआय शुल्काबाबत विरोधक फेक नॅरेटिव्ह' पसरवत असल्याच्या भाजपच्या आरोपाचा राऊत यांनी समाचार घेतला. कुणीही फेक नॅरेटिव्ह पसरवत नाहीये. पेट्रोल पंपचालक, दुकानदार जे रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत, त्यांना काय कळत नाही का? देवेंद्र फडणवीसांचा प्रॉब्लेम काय आहे, हेच समजत नाही. कोणताही विषय समजून घेण्याच्या ते पलीकडे गेले आहेत.

# ईपीएफओ वेतन मर्यादा २५ हजारांपर्यंत वाढविण्याच्या निर्णयाचे स्वागत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या (ईपीएफओ) अनिवार्य वेतन मर्यादेत १५ हजार रुपयांवरून २५ हजार रुपये प्रतिमहिना वाढ करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिल्याच्या निर्णयाचे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघाने स्वागत केले आहे. या निर्णयामुळे सुमारे ५१ लाख अतिरिक्त कर्मचारी ईपीएफओच्या सामाजिक सुरक्षा कक्षेत येण्याची अपेक्षा असून, ठेका व कंत्राटी कामगारांसह मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, पेन्शन व विमा संरक्षणाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचे महासंघाने म्हटले आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघाचे अहिल्यानगर जिल्हा चिटणीस सचिन पाटील यांनी सांगितले की, केंद्र सरकारचा हा निर्णय देशातील कामगारांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. ईपीएफओची वेतन मर्यादा २५ हजार रुपयांपर्यंत वाढल्याने १५ हजार ते २५ हजार रुपये वेतन घेणाऱ्या अनेक कामगारांना सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा व्यापक लाभ मिळणार आहे.



विशेषतः कंत्राटी व ठेका कामगारांसाठी हा निर्णय दिलासा देणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय मजदूर संघ आणि अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाच्या माध्यमातून कंत्राटी व ठेका कामगारांना सामाजिक सुरक्षा, योग्य वेतन, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, विमा संरक्षण तसेच अन्य कामगार हक्क मिळावेत यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. ईपीएफओच्या वेतन मर्यादेत वाढ करण्याची मागणीही कामगार संघटनांकडून दीर्घकाळापासून करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा निर्णय सामाजिक सुरक्षा व्यवस्थेचा विस्तार करणारा महत्त्वाचा टप्पा असल्याचे महासंघाने म्हटले आहे. वेतन मर्यादा वाढल्यामुळे सुमारे ५१ लाख अतिरिक्त कर्मचारी ईपीएफओच्या कक्षेत येण्याची अपेक्षा आहे. पात्र कर्मचाऱ्यांना लागू नियमांनुसार कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी पेन्शन योजना आणि कर्मचारी ठेव-संलग्न विमा योजनेशी संबंधित सामाजिक सुरक्षा लाभ मिळू शकतील. त्यामुळे कामगारांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षिततेलाही बळकटी मिळणार आहे.

कंत्राटी कामगारांपैकी मोठ्या संख्येने कर्मचारी १५ हजार ते २५ हजार रुपये या वेतन श्रेणीत कार्यरत असल्याने या निर्णयाचा या वर्गाला विशेष फायदा होण्याची अपेक्षा आहे. भविष्य निर्वाह निधी व सामाजिक सुरक्षा योजनांचा विस्तार झाल्यामुळे कामगारांच्या कुटुंबांनाही दीर्घकालीन आर्थिक आधार मिळण्यास मदत होणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करताना महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघाने कंत्राटी व ठेका कामगारांच्या सामाजिक सुरक्षेचा विस्तार, समान कामासाठी समान वेतन, कंत्राटी कामगारांचे नियमितीकरण, भविष्य निर्वाह निधी व कर्मचारी राज्य विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच कामगार कायद्यांचे काटेकोर पालन यासाठीचा पाठपुरावा यापुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कंत्राटी व ठेका कामगारांना सामाजिक व आर्थिक सुरक्षा मिळणे ही काळाची गरज आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाची देशभर प्रभावी, पारदर्शक आणि काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे सचिन पाटील यांनी सांगितले. अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघानेही केंद्र सरकारचे आभार मानत या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# पत्रकार विनोद बूब यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील ज्येष्ठ कार्यकर्ते व पत्रकार कॉ. विनोद बूब (वय ७८) यांचे रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक, विद्यार्थी चळवळ आणि पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



कॉ. विनोद बूब हे सत्तरच्या दशकात संगमनेरात कॉ. बापू हासे यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थी चळवळीत सक्रिय होते. विद्यार्थी चळवळीच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने भूमिका घेतली. त्यानंतर ८०च्या दशकात त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला. दै. लोकमतचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी संगमनेर परिसरातील विविध सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक प्रश्नांना आपल्या लेखणीतून प्रभावीपणे वाचा फोडली. पत्रकारितेबरोबरच सामाजिक चळवळीशी असलेली त्यांची नाळ अखेरपर्यंत कायम राहिली. साधी राहणी, स्पष्ट विचार आणि सामाजिक प्रश्नांबाबतची संवेदनशील भूमिका यामुळे त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

गेल्या काही दिवसांपासून ते आपला मुलगा रामनुज यांच्याकडे पुणे येथे वास्तव्यास होते. तेथेच त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा रामनुज, कुटुंबीय व आप्तेष्ट असा परिवार आहे. सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी पुणे येथून पार्थिव आणल्यानंतर येथील अमरधाम येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, पत्रकारिता व विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी उपस्थित राहून कॉ. विनोद बूब यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## पान १ वरून मालपाणी...

दरम्यान, मालपाणी उद्योगसमूहाचे संचालक मनीष मालपाणी व गिरीश मालपाणी यांच्या वतीने आमदार अमोल खताळ यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मालपाणी उद्योगसमूहाच्या सौ. ललितादेवी मालपाणी यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवर व नागरिकांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी मिरवणुकीत सहभागी झालेले नागरिक, कर्मचारी, कलाकार आणि मान्यवर यांच्यात उत्साहाचे वातावरण होते. भक्ती, परंपरा आणि सांस्कृतिक कलाविष्कारांचा सुरेख संगम घडवत मालपाणी उद्योगसमूहाची गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात पार पडली.

**विसर्जन मिरवणुकीत मालपाणी उद्योग समूहाचा स्वच्छतेचा आदर्श**

**भव्य गणेश विसर्जन मिरवणुकीत हजारो नागरिकांच्या सहभागाने उत्साहाचे वातावरण असताना मालपाणी उद्योग समूहाने स्वच्छतेचा आदर्श घालून दिला. सुमारे अडीच ते तीन हजार कर्मचारी सहभागी असलेल्या मिरवणुकीच्या शेवटी घंटागाडी व सफाई कर्मचारी तैनात करण्यात आले होते. मिरवणुकीदरम्यान निर्माण होणारा कचरा तत्काळ संकलित करून रस्ते स्वच्छ ठेवण्यात आले. उत्सवाचा आनंद घेतानाच स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही जपता येते, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. मालपाणी परिवाराच्या सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांच्या मालिकेतील हा उपक्रम संगमनेरकरांचे विशेष लक्ष वेधून गेला.**

## ग्रामपंचायत टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर ब -१ निविदा नोटीस

सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन किंत्राटदाराकडून लफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कामाचे नाव | योजना | निविदा विक्री | बयाणा रक्कम | निविदा रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे टाकळी ढोकेश्वर येथे गावांतर्गत गव्हाळी रस्ता सुभाष खिलारी ते बाबा गागरे वस्ती रस्ता करणे | नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान योजना सन २०२५-२६ | ५९०/- | -- | ७६२४१५/- | ६ महिने | सु. बे. |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **टाकळी ढोकेश्वर** कार्यालयात **दि. २२/०९/२०२६ ते दि. २८/०९/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा **दि. २८/०९/२०२६** रोजी संध्याकाळी ठीक ०६.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं. **टाकळी ढोकेश्वर** येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी **टाकळी ढोकेश्वर** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. २८/०९/२०२६** रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **टाकळी ढोकेश्वर** ता. पारनेर जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे ) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अ.नगर**

**सरपंच**
**ग्रा. पं. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अ.नगर**

नोंदणी क्र. : -NR/SNR/RSR/(CR)787/91 Date: 08/07/1991

## विजय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

**ऋणानुबंध, पुणे नाशिक रोड, गणेशनगर, संगमनेर जि. अहिल्यानगर ४२२६०५. फोन नं. ०२४२५ २२६०८३**

**श्री. योगेश वासुदेव उपासनी, विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय**

**वसुली अधिकाऱ्याचा पत्ता : ऋणानुबंध, कॉलेज रोड, संगमनेर, मु.पो. संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर**
**संस्थेचा पत्ता : ऋणानुबंध, कॉलेज रोड, संगमनेर, मु.पो. संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर**

दि. २२/०९/२०२६

### स्थावर मिळकत विक्रीचा जाहीरनामा

ज्या अर्थी **विजय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. संगमनेर, शाखाः विजय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर, गणेशनगर शाखा, ऋणानुबंध, नाशिक पुणे रोड, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी खाली नमूद केलेल्या थकबाकीदाराविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ अन्वये मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय सह/उप/सहाय्यक (परसेवा) निबंधक सहकारी संस्था ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर अथवा महाराष्ट्र सह. संस्थांचे अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये मा. ना. सहकार न्यायालय यांचेकडून दाखले मिळविले असून त्याच्यावर रीतसर मागणी नोटीस व स्थावर मालमत्ता जप्ती हुकुम बजावला आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १०७(१०) नुसार मला असलेल्या अधिकारास अनुसरून मी श्री. उपासनी योगेश वासुदेव, विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील प्रमाणे जप्त केलेली मालमत्ता थकीत रक्कम वसुलीकरिता जाहीर लिलावाने विक्री करीत आहे.

**तरी जप्त स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेवू इच्छीणाऱ्यांनी लिलावाच्या ठिकाणी खाली नमूद केलेल्या तारखेस व वेळेस उपस्थित राहावे.**

**कर्जदार : सीमा रमेश सिनारे, सहकर्जदार सौ सिंधुबाई नानासाहेब गुंजाळ ४९,८८,९७१/- + इतर खर्च + सरचार्ज दि. १४/०६/२०२३ पासून १५.००% व्याज**

| अ.नं. | कर्जदाराचे नाव/ सहकर्जदार नाव | दाखला क्र.व दिनांक | गावाचे नाव | गट नं./ घर नं. | क्षेत्र | | आकार | | आकार | | | इतर बोजे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | हे | आर | रू. | पै. | पु. | प. | उ. द. | |
| १ | सहकर्जदार - सौ सिंधुबाई नानासाहेब गुंजाळ | ८९/२०२३ ०८/१२/२०२३ | मौजे कोळवाडे | ७१/२ | ० | ८५ | ० | २.३० | | | | विजय पतसंस्था |

**लिलावाचे ठिकाण : विजय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. संगमनेर, शाखाः ऋणानुबंध, कॉलेज रोड, गणेशनगर संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

**लिलावाचा दिनांकः २२/१०/२०२६** **लिलावाची वेळ सकाळी : ११.३०**

स्थावर मालमत्तेवर नमूद थकबाकीदारांचा हक्क, दावा व हितसंबंध आणि मालमत्तेची अथवा स्थावरच्या काही भागांची किंवा त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाची अथवा फायद्याची विल्हेवाट लावण्याचा जो जो अधिकार आपल्या हितासाठी कायदेशीर मार्गानं चालवू शकतो, तो तो अधिकार जाहीर लिलाव करून सर्वाहून अधिक रक्कम बोलेल त्यास लिलावात पुकारलेल्या वाजवी किमतीत त्या त्या शर्थी व अटीस पात्र राहून विक्री केली जाईल.

१) कर्जदाराने कर्ज रक्कम पूर्ण भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
२) लिलावाच्या अटी व शर्थी लिलावाचे ठिकाणी वाचून दाखविण्यात येतील.
३) लिलाव तहकूब अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

**दिनांक– २२/०९/२०२६**
**स्थळ – संगमनेर**

**श्री. योगेश वासुदेव उपासनी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**विजय नागरी सह. पतसंस्था मर्या, संगमनेर**

**॥ विना सहकार नाही उध्दार ॥**

नोंदणी क्र.ए.एन.आर/एस.एन.आर/आर.एस.आर./ (सी.आर.) ७६६/८९-९० दि.१०/०१/१९९०

## दुधगंगा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

**दुधगंगा कॉर्नर, पावबाकी सुकेवाडी रोड, संगमनेर -४२२६०५,**
**फोनः २२५९०७, फॅक्सः ०२४२५-२२५९०७**

**दि. १४/०९/२०२६**

### अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)

**दुधगंगा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर** या संस्थेची ३७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २९.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थेच्या दुधगंगा हॉल, येथे **मा. बाळासाहेब थोरात साहेब (माजी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य.)** यांचे उपस्थितीत व संस्थेचे चेअरमन श्री. सुभाष सखाराम कुटे यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार विनिमय करणेसाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे हि नम्र विनंती.

**सभेपुढे येणारे विषय**

१) मा. नियोजित अध्यक्ष साहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) सन २०२५-२६ चे तेरीज, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
४) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे. तसेच सन २०२६-२७ या वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२५-२६ चा वैधनिक लेखापरीक्षकांचा अहवाल वाचून त्याची नोंद घेणे व दोष दुरुस्ती अहवाल खात्याकडे पाठविणे.
६) सन २०२६-२०२७ वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
७) संस्थेच्या थकीत कर्जदारांस संशयित व बुडीत निधीतून दिलेल्या सुटीस मान्यता देणे.
८) संस्थेच्या थकीत कर्जदारांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत विचार-विनिमय करणे व स्वीकृती देणे.
९) संशयित कर्ज खात्यांमध्ये झालेल्या कथित गैरव्यवहार, फसवणूक, संगनमत व संस्थेच्या आर्थिक नुकसानीबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये टेस्ट ऑडिट / विशेष तपासणी प्रस्ताव मा. जिल्हा उपनिबंधक यांचेकडे सादर करणे बाबत विचार विनिमय करणे.
१०) शाखा वडगावपान येथील शाखांचे फर्निचर व तिजोरी या शाखेत असून सदर ग्रामपंचायत ने शाखेच्या शटरला कुलूप लावले असून त्यामुळे फर्निचर व तिजोरी त्या शाखेमध्ये अडकून पडली आहे याबाबत विचार-विनिमय करणे.
११) मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार-विनिमय करणे.

**मा. संचालक मंडळाच्या आदेशाने**
**श्री. कैलास तुकाराम कोल्हे**
**व्यवस्थापक**
**दुधगंगा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित**

**स्थळ – संगमनेर**
**दिनांक– १४/०९/२०२६**

**सुचना –**

१) सभेस आवश्यक असलेली गणसंख्या न झाल्यास सभा तहकूब करून त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सुरु करून उपस्थित सभासदांसमोर सभेचे कामकाज करण्यात येईल.
२) सभेच्या कामकाजात फक्त सभासदांनाच भाग घेता येईल.
३) कोणत्याही सभासदास प्रश्न अथवा शंका असल्यास त्यांनी सभेच्या तीन दिवस अगोदर म्हणजे दिनांक २६/०२/२०२६ पूर्वी लेखी स्वरुपात संस्थेचे व्यवस्थापक यांच्याकडे द्यावेत. मुदतीत दिलेल्या निवेदनावरच वार्षिक सभेत विचार करण्यात येईल.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
We treat He cure's
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्यूरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# 'हे भले भाऊ भले'च्या गजराने शेतकरी मेळावा दुमदुमला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- मराठीमध्ये बोलीभाषांचा वेगवेगळ्या प्रकार आहे. तसा गीतांचाही वेगवेगळ्या प्रकार आहे. पोवाडे, लावणी, गवळण, भारुड, कोळीगीते, भलेरी गीते, वान जात्यावरची गीते असे अनेक गीतांचे प्रकार आहेत. यापैकी भलरीवानातून दुष्काळी संगमनेर तालुक्याचा माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संघर्ष व प्रगतीचा वैभवशाली इतिहास ८५ वर्षीय म्हाळू बाबा साबळे यांनी हे भले भाऊ भले म्हणत आवाज दिला आणि शेतकरी मेळाव्यात हा भलरीवाण गीताचा आवाज घुमला.

वडगाव पान येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व शेतकरी मेळाव्यात हे अनोखे पारंपारिक संस्कृतीचे दर्शन उपस्थित हजारो शेतकऱ्यांना पाहायला मिळाले. कॉंग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, गीताराम गायकवाड व संगमनेर तालुक्यातील सर्व संस्थांचे पदाधिकारी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी समोर शेतकऱ्यांमध्ये ८५ वर्षीय म्हाळू बाबा साबळे बसलेले होते. त्यांना पाहताच माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी त्यांना आदराने व्यासपीठावर बोलवले आणि शेजारी बसवले. प्रास्ताविक पूर्वी शेतकरी मेळाव्यात म्हाळुबाबांनी एक वाण - गावा अशी डॉ.जयश्रीताई थोरात यांच्यासह सर्वांनी मागणी केली. मग लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी बाबांना आदरपूर्वक माईक देत त्यांना गीतासाठी विनंती केली यानंतर या ८५ वर्षीय तरुणाने हे अन्नभाई म्हणत आवाज दिला. आणि टाळ्यांचा कडकडाट झाला.

असा संगमनेर तालुक्याचा दुष्काळी ते प्रगतशील तालुका आलेख दर्शवणारा सहकार शिक्षण समृद्धी ग्रामीण विकास संगमनेर शहराचा विकास असा सात मिनिटांचा भलरी वान त्यांनी गायला. तालासुरात ८५ वर्षी आजोबांचे हे गीत ऐकून प्रत्येक वाक्यानंतर टाळ्यांचा कडकडाट होत होता तर त्यांचे पुतणी कारभारी साबळे यांनी भले भाऊ भले म्हणत बाबांना साथ दिली. माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, जुनी माणसं ही आपली आदर्श आहेत या लोकांनी संघर्ष केला आहे.

# भाषा ही केवळ अभिव्यक्तीचे माध्यम नसून प्रगतीचे साधन - डॉ. संजय मालपाणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर हिंदी दिवसाच्या निमित्ताने हिंदी दिवस समारोह अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या साईबाबा सभागृहात आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. सुमारे तीनशे विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमाचा आनंद घेतला. या कार्यक्रमास शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ.रवींद्र ताशिलदार, श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र ढमक , हिंदी विभागप्रमुख प्रो. डॉ. जितेंद्र पाटील, प्रो. डॉ. सचिन कदम, आदि मान्यवर उपस्थित होते.

डॉ.संजय मालपाणी पुढे बोलताना म्हणाले की, भाषिक कौशल्यातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा परिपूर्ण विकास घडतो.विद्यार्थ्यांनी रोज हिंदी साहित्याचे वाचन करून नवनवीन शब्दांचा संग्रह करणे काळाची गरज आहे. हिंदी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती समृद्ध साहित्य, संस्कृती आणि भावविश्वाची वाहक आहे, असे प्रतिपादन डॉ.संजय मालपाणी यांनी केले.

या प्रसंगी डॉ. मालपाणी यांनी कविता कशी सादर करावी याचा आदर्श वस्तुपाठ देत आपल्या ओजस्वी वाणीने, प्रभावी वक्तृत्वाने आणि वीररसपूर्ण काव्यप्रस्तुतीने त्यांनी संपूर्ण सभागृहाला मंत्रमुग्ध केले. त्यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, आत्मविश्वास आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. डॉ. मालपाणी यांच्या वक्तृत्वाची विशेष छाप कार्यक्रमावर उमटली. त्यांच्या शब्दांची जादू आणि वीररसाच्या प्रभावी प्रस्तुतीमुळे सभागृहातील वातावरण भारावून गेले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांच्या व्याख्यानाचा आनंद घेतला. त्यांच्या विचारांनी उपस्थित प्राध्यापक वर्गालाही प्रेरित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व पटवून देत भाषा आणि साहित्याच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी करावा, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रो. डॉ. जितेंद्र पाटील यांनी केले व विभागाच्या विविध कार्यक्रमाचा आढावा सदर केला. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सत्काराचे निवेदन प्रो. डॉ. सचिन कदम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरद शिरोळे तर आभार प्रदर्शन प्रा निलेश गायकवाड यांनी केले. सदर कार्यक्रमात विभागाच्या वतीने आयोजित निबंध स्पर्धा, काव्य वाचन स्पर्धा, लघुफिल्म परीक्षण लेखन स्पर्धेतील विजेत्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.तसेच हिंदी विभागातील गुणानुक्रमे प्रथम व वर्षभर उत्कृष्ट सहभाग नोंदविणाऱ्या समाधान जोर्वेकर , ऋतुजा क्षीरसागर , गायत्री गुंजाळ या विद्यार्थ्यांना उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्काराने गौरविण्यात आले.



या कार्यक्रमासाठी हिंदी विभागप्रमुख प्रो. डॉ. जितेंद्र पाटील, विभागातील प्रो. डॉ. सचिन कदम, डॉ. सुनील चव्हाण, डॉ. शरद शिरोळे आणि प्रा. निलेश गायकवाड तसेच अनुष्का यंगल, अश्विनी पवार, ओंकार इंगळे आदित्य बोऱ्हाडे ,वैश्विक भागवत , सौरभ कानवडे ,सार्थक डुबे , योगेश वेताळ साधना फड , निकेश शहा, अंजू गौतम आदि विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रो. डॉ. जगदाळे, प्रो. डॉ. वामन, प्रो. डॉ. मंडलिक, डॉ. श्रीनिवास भिसे ,प्रा. कल्पना शिंदे, श्री. विजय पाटील यांच्यासह अन्य प्राध्यापकांची उपस्थिती लाभली. हिंदी विभागाच्या नियोजनबद्ध आयोजनामुळे आणि विद्यार्थी-प्राध्यापकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हिंदी दिवस समारोह संस्मरणीय ठरला.

# वृंदावन स्कूलचे योगा स्पर्धेत घवघवीत यश

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

जिल्हास्तरीय योग स्पर्धेत वृंदावन स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत उज्वल यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी वैयक्तिक यश संपादन करतानाच शाळेला रनर अप ट्रॉफीने सन्मानित करण्यात आले.

अभिनव शिक्षण संस्था अकोले येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय योगा स्पर्धेत वृंदावन इंग्लिश मीडियम स्कूलचे सतरा विद्यार्थी सहभागी झाले होते. कठोर परिश्रम नियमित सराव शिस्त एकाग्रता आणि आत्मविश्वास या पंचसूत्रीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी विविध योगासन प्रकारात उज्वल यश संपादन केले. ८ वर्षे वयोगट : लेग बॅलन्स प्रकारात कु. अलिशबा मोमीन द्वितीय क्रमांक, ट्विस्टिंग प्रकारात कु. रूमेसा पटेल द्वितीय क्रमांक, ट्रॅडिशनल प्रकारात कु. आरोही खेमनर तृतीय क्रमांक. १० वर्षे वयोगट : कु. शिवन्या डोंगरे ट्रॅडिशनल प्रकारात प्रथम क्रमांक, कु. ईश्वरी सरोदे ट्विस्टिंग प्रकारात तृतीय, कु. श्रीजा शेटे ट्रॅडिशनल प्रकारात तृतीय क्रमांक तर १४ वर्षे वयोगटात कु. अनम चौगुले द्वितीय क्रमांक, कु. प्रिया पावसे ट्रॅडिशनल प्रकारात तृतीय क्रमांक आणि अद्विक रहाणे याने हॅण्ड बॅलन्स प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांचे योगा स्पर्धेतील उत्कृष्ट प्रदर्शनामुळे वृंदावन स्कूललाही रनर ट्रॉफीने सन्मानित करण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शाळा व्यवस्थापनाचे डॉ. आर. एस गुंजाळ वेलफेअर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राधेश्याम गुंजाळ, सचिव राहुल गुंजाळ आणि स्कूलच्या चेअरमन सोनल गुंजाळ यांनी अभिनंदन केले.

# शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रवीण गडाख, उपाध्यक्षपदी स्वाती पावसे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरगाव पावसा तालुका संगमनेर येथील शाळा व्यवस्थापन समितीचे नुकतेच पुनर्गठन करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद पावसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पालक सदस्यांमधून अध्यक्षपदी प्रवीण सुभाष गडाख, तर उपाध्यक्षपदी स्वाती दगडू पावसे यांची पुढील दोन वर्षांसाठी बिनविरोध निवड करण्यात आली.

शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यपदी प्रवीण गडाख, गोकुळ गडाख, सोनाली मेंगाळ, गणेश दवंगे, स्वाती पावसे, शरीफा पठाण, प्राजक्ता गडाख, दीपक गुळवे, शिल्पा भालेराव, प्रतिभा वाकचौरे, सुनील पावसे आणि प्रवीण धीवर यांची निवड करण्यात आली. यावेळी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणपतराव पावसे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद पावसे, किरण पावसे, सुशीला पावसे, दीपक गुळवे, गणेश दवंगे, मुख्याध्यापक आर.पी. राहणे, शिक्षक हरिभाऊ सहाने, मीनल बिडवे आदी उपस्थित होते.

नूतन अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे सरपंच सुभाष गडाख, उपसरपंच सुजाताई दवंगे, दूध संघाचे संचालक डॉ. प्रमोद पावसे, काशिनाथ पावसे, डॉ. विजय पावसे, सोमनाथ भालेराव, केशव दवंगे, रामनाथ गडाख, मच्छिंद्र गडाख, भीमाशंकर पावसे, मेजर चिमाजी पावसे, डॉ. संदीप पावसे, माजी मुख्याध्यापक आप्पासाहेब गडाख, सरपंच सेवा संघाचे संस्थापक यादवराव पावसे, हॉटेल मयूर एक्सप्रेसचे रामनाथ पावसे, अनिल गडाख, संतोष पावसे, माजी मुख्याध्यापक रमेश पावसे, बालसंस्कार प्रतिनिधी अनिताताई दिवटे, प्रीती गडाख, हॉटेल मुळगंगा चे संपत पावसे, उत्तमराव जाधव, ग्रामविकास अधिकारी हरीश गडाख, दिनकर भालेराव, नामदेवराव पावसे, पत्रकार नितीन भालेराव, बाबुराव पावसे सर, मच्छिंद्र पावसे, सचिन सस्कर, दिगंबर पावसे, विकास गडाख, इंजिनीयर विठ्ठल पावसे, मंगल पावसे, सुवर्णा हासे, बाळासाहेब भालेराव, विनोद पावसे, दत्तात्रय पावसे सर, आर. जी. पावसे सर, श्रीधर गडाख आदींनी अभिनंदन केले.

# गणेशोत्सवानिमित्त अनिल महाराज देवळेकर यांचे सोमवारी कीर्तन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरानजीक असलेल्या घुलेवाडी येथे गणेशोत्सवानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तरुण मित्र मंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित कीर्तनाचे आयोजन केले आहे. याच उपक्रमांतर्गत सोमवार, दि.२१सप्टेंबर२०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हिंदुत्ववादी कीर्तनकार अनिल महाराज देवळेकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

घुलेवाडी येथील आमदार अमोल खताळ पाटील यांच्या निवासस्थानी समोरील परिसरात हे कीर्तन होणार आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमातून भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्यात येणार आहे. अनिल महाराज देवळेकर यांच्या प्रभावी कीर्तनातून उपस्थित भाविकांना छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास उलगडून दाखविणार आहे या कीर्तन कार्यक्रमास घुलेवाडी तसेच संगमनेर शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तरुण मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बिरेवाडीत २५ चिंचेच्या रोपांचे वृक्षारोपण

## संत गाडगेबाबा भानुप्रभाकार सेवाप्रतिष्ठानचा उपक्रम

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्री संत गाडगेबाबा भानुप्रभाकार सेवाप्रतिष्ठान, गोविंदनगर, संगमनेर यांच्या वतीने कार्यक्रम क्रमांक २४१ अंतर्गत बिरेवाडी, नान्नज येथे २५ चिंचेच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनासोबतच विद्यार्थ्यांमध्ये वृक्षसंवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



कार्यक्रमाचे प्रमुख सूत्रधार ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नजचे शिक्षक बाळासाहेब पिंगळे होते. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. के. के. देशमुख, सेवानिवृत्त एलआयसी कर्मचारी एस. जे. माळी, प्रा. संदीप सातपुते, विद्यालयाचे मुख्याध्यापक हौशिराम सोनवणे, वृक्षमित्र बबन घुगे, सेवानिवृत्त शिक्षक सुभाष वारुंक्षे, डॉ. गणेश फड, हरिभाऊ फड, छबुराव फड, पांडुरंग फड, सदाशिव फड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बिरेवाडीचे शिक्षक अशोक गायकवाड व सुनील देशमुख तसेच श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज-दुमाला येथील शिक्षकांनी उपक्रमात सहभाग घेतला. आर्यन फड, अर्णव घुगे, दर्शन चत्तर, सुयोग गायकवाड, सुयश कोटकर, कौशल्य कोटकर, अक्षय पाडेकर, ओमकार पाडेकर, सार्थक कोटकर यांच्यासह विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणात योगदान दिले.

चिंचेची झाडे ग्रामीण भागातील पर्यावरणासाठी उपयुक्त असून त्यांच्यामुळे परिसरातील हिरवाई वाढण्यास मदत होते. वृक्षारोपण केल्यानंतर रोपांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याने लावलेल्या रोपांची नियमित देखभाल करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. वाढते तापमान, कमी होत चाललेली वृक्षसंख्या आणि बदलते हवामान यामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज वाढली असून, अशा उपक्रमातून ग्रामस्थ व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण होत आहे. या प्रसंगी मुंग्यांना साखर आणि पक्ष्यांना धान्य वितरित करण्यात आले. पर्यावरणातील जैवविविधता आणि पशुपक्ष्यांचे संरक्षण याबाबतही यामधून संदेश देण्यात आला. डॉ. एम. डी. घुले तसेच सेवानिवृत्त प्राचार्य विश्वनाथ भुजबळ यांनी कार्यक्रमास सदिच्छा भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

श्री संत गाडगेबाबा भानुप्रभाकार सेवाप्रतिष्ठानच्या वतीने पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. यापूर्वी कार्यक्रम क्रमांक २४० अंतर्गत शिबलापूर, पानोडी, हजारेवाडी, जाधव वस्ती व ठाकरवाडी येथे उपक्रम राबविण्यात आला होता. ग्रामीण भागात वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे.


रजि. नं.-पी.एन.ए./आर.एस.आर./३७१ रजि: दिनाक २८/०७/१९७२

**संगमनेर तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित संगमनेर**

जा. क्र. वा.स.सभा. ९/२०२६ **मु. पो. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** दिनांक- ११/९/२०२६

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (सन २०२५- २०२६ फक्त सभासदांसाठी)**

संगमनेर तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित संगमनेर या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२६/९/२०२६ रोजी दुपारी १.०० वा. संस्थेचे चेअरमन श्री. भानुदास शंकर उपाध्ये यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या ठिकाणी खालील विषयांचा विचार विनिमय करणेसाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सदर सभेस हजर रहावे. हि नम्र विनंती.

**सभेपुढे येणारे विषय**

१) मा. नियोजित अध्यक्षसाहेच यांना अध्यक्षस्थान स्विकारणे बाबत विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
३) दि. ३१/०३/२०२६ अखेरच्या हिशोब पत्रकास मंजुरी देणे नफा वाटणीस मान्यता देणे.
४) सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
६) लेखापरीक्षण अहवाल वाचन करणे बाबद.
७) सन २०२६-२०२७ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे बाबद.
८) ऑफिस व गोडाऊन दुरूस्त करणे बाबद.
९) संगमनेर औद्योगिक वसाहत येथे भाडे करारावर घेतलेल्या प्लॉट मध्ये उद्योग व्यवसाय सरू करणे बाबद.
१०) अ. नगर जिल्हा सहकार बँके मार्फत ग्रामीण कारागिर यांना कर्ज पुरवठा करणे बाबद.
१२) ग्रामोद्योग वसाहती बाबत विचार विनिमय करणे.
१३) कृषी उत्पन्न बाजार समिती संगमनेर व संस्थेच्या जागेबाबत चालू असलेल्या कोर्ट केस संबंधात विचार विनिमय करणे.
१४) मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

✻ आपले नम्र ✻

श्री. विजय दत्तात्रय शिपणकार, सं. सचिव — श्री. राजेंद्र रंगनाथ अवसक, व्हा. चेअरमन — श्री. भानुदास शंकर उपाध्ये, चेअरमन

**विद्यमान संचालक मंडळ**

श्री. बाजीराव बापूराव साळुके
श्री. भाऊसाहेब भगवतां काठे
श्री. लक्ष्मण जानकू जोशी
सौ. सुनिता सतिष घबाडे
श्री. अरूण रघुनाथ बिबवे
श्री. भाऊसाहब गेणू सिनारे
सौ. योगिता बाळचंद्र जोंधळे
श्री. संपतराव नारायणराव वाकचौरे

**टिप** १) सभेच्या वेळेस कोरम पूर्ण न झाल्यास त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून सभेच्या कामकाजास सुरूवात केली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.. २) सभासदांना संस्थेच्या सन २०२५ -२०२६ या काळातील कामकाजासंबंधी काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असल्यास त्याबाबत लेखी सुचना करावयाच्या असल्यास वार्षिक सभेच्या ३ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवसाखेरीज पोहचतील अशा वेळेस पाठविणे अगर समक्ष आणून देणे. अशा प्रश्नांची उत्तरे व खुलासे मा. संचालक मंडळाकडून दिली जातील. ऐनवेळी विचारलेल्या माहितीचा विचार केला जाणार नाही. ३) वार्षिक अहवाल हिशोबाची पत्रके संचेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**सभेचे ठिकाण- संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती संगमनेर ता. संगमनेर जि. अ.नगर**

# संपादकीय...

## कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्ताने

## बहुजनांच्या शिक्षणासाठी आयुष्य वेचणाऱ्या कर्मयोग्याची प्रेरणादायी गाथा

कमवा आणि शिका' या विचारातून हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या कर्मवीरांना जयंतीनिमित्त अभिवादन महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर त्या विचारांना कृतीची जोड देऊन समाजाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले. कर्मवीर भाऊराव पाटील हे अशाच महान समाजसुधारक, शिक्षणप्रसारक आणि कर्मयोगी व्यक्तिमत्त्वांपैकी एक. ग्रामीण, गरीब आणि वंचित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, या ध्येयाने त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणाच्या प्रसारासाठी समर्पित केले. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा इतिहासच पुन्हा एकदा आठवणे होय. भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज येथे झाला. लहानपणापासूनच समाजातील विषमता, गरिबी आणि शिक्षणापासून वंचित असलेला मोठा वर्ग त्यांनी जवळून पाहिला. शिक्षण हे केवळ काही मोजक्या श्रीमंत किंवा उच्चवर्गीय लोकांसाठी मर्यादित न राहता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. त्या काळात ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना आपल्या मुलांना शिक्षण देणे आर्थिकदृष्ट्या शक्य नव्हते. शिक्षणासाठी शहरात जाणे, राहण्याचा खर्च करणे आणि दैनंदिन गरजा भागवणे ही मोठी अडचण होती. या परिस्थितीचा विचार करून भाऊराव पाटील यांनी 'कमवा आणि शिका' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. विद्यार्थ्यांनी स्वतः श्रम करायचे आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या मदतीने आपले शिक्षण पूर्ण करायचे, ही या संकल्पनेमागची भूमिका होती. भाऊराव पाटील यांनी १९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. 'रयत' म्हणजे सामान्य जनता. समाजातील सर्वसामान्य माणसापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे काम या संस्थेने पुढे मोठ्या प्रमाणावर केले. ग्रामीण भागात शाळा सुरू करणे, वसतिगृहे उभारणे आणि गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या कार्याची खरी ताकद त्यांच्या साधेपणात होती. विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागणे, स्वतः श्रम करणे आणि शिक्षणाला समाजसेवेचे माध्यम मानणे हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि समानतेची भावना निर्माण व्हावी, यावर त्यांचा विशेष भर होता. भाऊराव पाटील यांच्या विचारांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक समतेच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करता येईल, असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी शिक्षणाचा विस्तार केवळ शहरांपुरता न ठेवता खेड्यापाड्यांपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून पुढे महाराष्ट्राच्या विविध भागांत शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहे उभी राहिली. हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. विशेषतः शेतकरी, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात या चळवळीचे मोठे योगदान आहे.

---

तहसिल कार्यालय, संगमनेर
क्रं.कावि/दंडाधि/वारस/२०२६
दिनांक – /०९/२०२६

**तमाम लोकांस कळविण्यात येते की,**

**कै. दिनकर भिवसेन कदम रा. संगमनेर, ता. संगमनेर** हे दिनांक ०४/०८/२०२६ रोजी मौजे लोणी या ठिकाणी मयत झालेले असुन ते सा. बा. उपविभाग राजुर येथे वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत होते. त्याना वारस खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | मोहीनी दिनकर कदम | ४७ वर्ष | पत्नी |
| २. | ईशिका दिनकर कदम | २४ वर्ष | मुलगी |
| ३. | अनुजा दिनकर कदम | २३ वर्ष | मुलगी |

वरील प्रमाणे मयतास वारस असून या व्यतिरिक्त मयतास दुसरे कोणीही वारस नाहीत. या वारसपत्राबाबत कोणास काही हरकत तक्रार घ्यावयाची असल्यास ती आज पासुन कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावी. तक्रार न आल्यास **श्रीमती. मोहिनी दिनकर कदम रा. संगमनेर, ता.संगमनेर जि.अहिल्यानगर** यांना कुटूंब प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस यास **श्रीमती. मोहीनी दिनकर कदम, रा. संगमनेर, ता.संगमनेर जि.अहिल्यानगर** यांचे अर्जावरुन दिली असे.

**तहसिलदार, संगमनेर**

---

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सदस्यपदी डॉ. सुशील एन. बेणके

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- शिक्षण, विज्ञान व करिअर मार्गदर्शन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. सुशील एन. बेणके यांना महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स ,इंडस्ट्री ज अग्रीकल्चर चे सदस्यत्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षण, उद्योग, कौशल्य विकास आणि उद्योजकता क्षेत्राला राज्यस्तरीय व्यासपीठाशी जोडण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

डॉ. सुशील एन. बेणके हे पीएचडी(केमिस्ट्री) आयसर पुणे असून त्यांनी शिक्षण व विज्ञान क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य केले आहे. रोटरी क्लब अकोले सेंट्रल चे सदस्य म्हणून कार्य करताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जे ई ई, निट, आयसर तसेच विविध उच्च शिक्षणाच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्याबरोबरच कौशल्य विकास, करिअर मार्गदर्शन आणि उद्योग-शिक्षण क्षेत्रातील समन्वयासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत.

ऊर्जा आय आय टी अकेडमी चे संचालक म्हणून त्यांनी ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणपद्धती, वैयक्तिक मार्गदर्शन आणि राष्ट्रीय स्तरावरील करिअर संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. तसेच विज्ञान व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून



आणण्यासाठी विविध उपक्रम त्यांनी राबविले आहेत.

रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री इंग्लंडचे असोसिएट मेंबर असलेले डॉ. बेणके यांच्या महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स मधील सहभागामुळे शिक्षण, विज्ञान, उद्योग, कौशल्य विकास आणि उद्योजकता या क्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्याच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होईल.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स,इंडस्ट्रीज ॲग्रीकल्चर हे महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचे व्यासपीठ असून, या संस्थेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील उद्योग व उद्योजकांच्या प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तसेच युवकांना उद्योग व करिअरच्या नव्या संधींशी जोडण्यासाठी कार्य करण्याचा मानस डॉ. बेणके यांनी व्यक्त केला आहे.

डॉ. सुशील एन. बेणके यांच्या या सदस्यत्वाबद्दल शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक व विविध क्षेत्रांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

---

# मालपाणी विद्यालयाच्या खेळाडूंची मैदानी स्पर्धेत चमकदार कामगिरी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुकास्तरीय मैदानी क्रीडा तसेच बुद्धिबळ स्पर्धेत संगमनेर येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत विविध पदकांवर आपले नाव कोरले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे अनेक विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१४ वर्षे वयोगटात आयुष भरत शेलार याने १०० मीटर धावण्यात, तर अनमोल मंगेश वामन याने लांब उडीत प्रथम क्रमांक पटकावला. अर्णव अर्जुन कोल्हे याने गोळाफेकीत तृतीय क्रमांक मिळवला. रिले स्पर्धेत आयुष शेलार, अनमोल वामन, मंथन दिनेश बांगर आणि कृष्णा बाळासाहेब वाळके या संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

१७ वर्षे गटात भूषण ज्ञानेश्वर रणमाळे याने लांब उडीत द्वितीय क्रमांक पटकावला. श्रद्धा संदीप गवांदे हिने थाळीफेकीत प्रथम, तर अनुष्का सचिन कर्पे हिने भालाफेकीत द्वितीय क्रमांक मिळविला. बुद्धिबळ स्पर्धेतही विद्यालयाने आपली गुणवत्ता सिद्ध केली. १४ वर्षे वयोगटात शार्दूल विजय पवार याने प्रथम क्रमांक, तर १७ वर्षे वयोगटात हर्षिता राहुल सराफ हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक तथा पर्यवेक्षिका रंजना पवार ,सुनील आढळ, सुप्रिया गुंजाळ, प्रियंका कोताडे,दीपक रहाणे यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, सर्व संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच क्रीडाप्रेमी नागरिकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

---

# जिल्हा माहिती कार्यालय व मॅककेअर हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य शिबिर



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर,- गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच गावागावांतील जनसमुदायाच्या उपस्थितीचा प्रभावी उपयोग करून शासनाचे धोरणात्मक निर्णय, विविध कल्याणकारी योजना आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर 'लोकसंवाद अभियान-२०२६' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत 'श्री गणेशा आरोग्याचा' या आरोग्य जनजागृती उपक्रमाद्वारे नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा व शासकीय योजनांची माहिती देण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर आणि मॅककेअर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने विशाल गणपती, माळीवाडा, अहिल्यानगर येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधीअंतर्गत उपलब्ध असलेल्या विविध आरोग्यविषयक सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आली. विशेषतः कर्करोगावरील उपचार, हृदय शस्त्रक्रिया, मेंदूविकार व शस्त्रक्रिया तसेच अस्थिरोग शस्त्रक्रिया यांसारख्या गंभीर आजारांच्या उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून मिळणाऱ्या मदतीची माहिती नागरिकांना देण्यात आली.

यावेळी ईशरीं उरपलशी डलीशशपळपस तसेच विविध प्रकारच्या कर्करोगाबाबत जनजागृती करण्यात आली. कर्करोगाचे प्राथमिक अवस्थेत निदान, नियमित आरोग्य तपासणी, लक्षणांकडे दुर्लक्ष न करण्याचे महत्त्व आणि वेळेत वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. गंभीर आजारांवरील उपचारासाठी आर्थिक अडचण भासणाऱ्या पात्र रुग्णांनी मुख्यमंत्री सहायता निधीअंतर्गत उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस आमचे अशिल श्रीकांत मारुतीसा क्षत्रिय (तवरेज) रा. नवघर गल्ली, संगमनेर यांचे वतीने सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीसीत परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही आमचे अशिल व त्यांचे सख्खे भाऊ संजय मारुतीसा क्षत्रिय (तवरेज) यांचे सामाईक खरेदी मालकीची असून सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा १/२ अविभक्त हिस्सा आहे. व सदर १/२ हिस्सा वाटुन विभागुन मिळणेसाठी आमचे अशिलांनी संजय मारुतीसा क्षत्रिय यांचे विरुध्द मे. सिव्हील जज सो. सिनिअर डिव्हीजन, संगमनेर यांचे कोर्टात रे. मु.नं.२६१/२०२१ हा दावा दाखल केलेला असून सदरचा दावा प्रलंबित आहे. सदर दावा प्रलंबित असतांना संजय मारुतीसा क्षत्रिय याने परिशिष्टात नमुद केलेली मिळकत बेकायदेशीरपणे त्याची पत्नी सौ. सुषमा संजय क्षत्रिय व मुलगा राजराजेश्वर संजय क्षत्रिय यांचे नावाघर तबदिल केलेली आहे. सुषमा संजय क्षत्रिय व राजराजेश्वर संजय क्षत्रिय यांना मिळकतीमध्ये कोणतेही कायदेशीर मालकी हक्क व अधिकार नाही, असे असतांना मिळकतींबाबत दावा प्रलंबित असतांना सुषमा संजय क्षत्रिय व राजराजेश्वर संजय क्षत्रिय हे दोघेही परिशिष्टात नमुद मिळकतीबाबत माहिती लपवून ठेवून बेकायदेशीर विक्री व्यवहार करणार असल्याचे आमचे अशिलांना खात्रीलायकरित्या समजले आहे. सबब तमाम लोकांस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, परिशिष्टात नमुद मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा १/२ अविभक्त हिस्सा असल्याने व त्याबाबत मे. सिव्हील जज सो. सिनिअर डिव्हीजन संगमनेर यांचे कोर्टात रै.सु.नं.२६१/२०२१ हा दावा प्रलंबित असल्याने परिशिष्टात नमुद मिळकती बावत कोणीही कोणत्याही स्वरुपाचा विक्री, गहाण, दान, बक्षिस अथवा तबदिलीचा कुठलाही व्यवहार सौ. सुषमा संजय क्षत्रिय व राजराजेश्वर संजय क्षत्रिय यांचे बरोबर करु नये. केल्यास मिळकतीची मालकी व ताबा मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**जि. अहिल्यानगर, ता. संगमनेर पैकी मौजे समनापूर येथील शेतजमीन**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| २५/१८/१ | ख. ०.४५ | ०.०० |

यास चतुः सिमा-पुर्वेस-ओढा, दक्षिणेस-स.नं.२५/१८ पैकी, पश्चिमेस स.नं.२५ पैकी, उत्तरेस-रस्ता.

येणे प्रमाणे मिळकतीचे परिशिष्ट असे.

ता. २०/०९/२०२६

**ॲड. श्रीकांत एच. गोंगे**
**देवी गल्ली, संगमनेर,**
**मोबा. नं. ९८२२४३१८८३**

---


**जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा**

**आर्कषक पगारावर जागा भरणे आहे**
**सुपरवायझर**
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
**ऑफिस असिस्टंट**
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
**उमंग इन्फ्राटेक**
**7875455777**

**पाहिजेत**
तरूणांसाठी सुवर्णसंधी
**राजवीर फार्मा**
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा
**पुरुष – ४ जागा (वय- १८ ते ४०)**
रविवार सुट्टी असते
आर्कषक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
**8669184141**

**फ्लॅट विकणे आहे**
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड,
पर्पल ब्लुम सोसायटी,
साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर,
1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड,
सोफा, टिव्ही युनिट
**8379064040**
**9960984718**

**पाहिजेत**
**दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा**
**आर्कषक पगार**
**राजा ड्रेसेस**
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
**8275191096**

**स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत**
**अकाऊंटंट मॅनेजर**
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॉर्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
ANKUSH MURALIDHAR KESEKAR
TO NEW NAME
ANKUSH MURLIDHAR KESEKAR
BY AFFIDAVIT NO. 1248/2026
DATE - 19/09/2026
ADD -1765, KESEKAR SADAN, KHANDOBA MANDIR, SALIWADA, TAL.SANGAMNER AHILAYANAGAR,422605

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
**कुटे हॉस्पिटल**
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
**8888882225**
**9766855593**

**पाहिजेत**
**रिषभ गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड**
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
**9604334777**
**8669888777**

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
**9822097904**
**9404971697**
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन
तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे
(दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
**7385653323**

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
**8282825818**

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
**एजंट स्वागत**
- संपर्क -
**9890468212**

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
**7709828846**






# बंटी यादव यांच्यावर दुसऱ्यांदा जिल्हाध्यक्षपदाची धुरा

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी बंटी यादव यांची दुसऱ्यांदा फेरनिवड करण्यात आली आहे. सामाजिक न्याय, समता आणि संविधानाच्या मूल्यांच्या रक्षणासाठी कार्यरत असलेल्या तळागाळातील कार्यकर्त्यावर पक्षाने पुन्हा विश्वास दाखवल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही निवड अखिल भारतीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी महसूल मंत्री आ. बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली, अखिल भारतीय काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र पाल गौतम, राष्ट्रीय समन्वयक डॉ. सिद्धार्थ भाऊ हत्तीआंबिरे तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पक्षाने सलग दुसऱ्यांदा जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी दिल्याबद्दल बंटी यादव यांनी वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. ते म्हणाले, माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर पक्षाने दुसऱ्यांदा विश्वास दाखवून महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या विश्वासाला सार्थ ठरवत भारतीय संविधानाने दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये जपण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. काँग्रेसचा विचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा आणि राहुल गांधी यांचा भारत जोडोचा संदेश तळागाळातील शोषित, वंचित, उपेक्षित, दलित, आदिवासी व बहुजन समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यरत राहणार आहे. संविधानाच्या रक्षणाच्या लढ्यात काँग्रेस पक्ष नेहमीच आघाडीवर राहिला असून, पुढील काळातही हा लढा अधिक ताकदीने पुढे नेण्याचा माझा संकल्प आहे, असेही यादव यांनी सांगितले.

दरम्यान, बंटी यादव यांच्या फेरनिवडीबद्दल संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते पँथर माणिकराव यादव, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात, जोर्वे जिल्हा परिषद गटाचे नेते शरद नाना थोरात, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर, संगमनेर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अजय फटांगरे, संजय भोसले यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून चुकीचे पसरवणाऱ्यांचा ...

माध्यमातून गैरसमज पसरते आहे .त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल असे सांगताना बँकेमार्फत अण्णासाहेब पाटील महामंडळाचे योजना सुरू असून जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. पद्मश्री रघुवीर खेडकर म्हणाले की अमृतवाहिनी बँकेने कोरोना काळात मला मोठी मदत केली आहे. मला मिळालेला पुरस्कार हा तालुक्याचा पुरस्कार आहे. थोरात साहेब मी माझे साहेब आहेत. त्यांच्या आशीर्वादाने आपले काम सुरू आहे .तत्व व सत्व जपणारा आपला राजा असल्याचे ते यावेळी म्हणाले.

यावेळी बँकेच्या वतीने व्हाट्सअप बँकिंग डिजिटल बँकिंग त्याचप्रमाणे एसएमएस वर लगेच ९% डिव्हिडंट सभासदांना पाठवण्यात आला. यावेळी नोटीस वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील जोशी यांनी केले प्रास्ताविक चेअरमन सुधाकर जोशी यांनी केले तर व्हा. चेअरमन नानासाहेब शिंदे यांनी आभार मानले. यावेळी अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी सभासद शेतकरी कर्जदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.. **सोशल मीडिया ही सध्या माहिती युगात प्रभावी माध्यम झाले आहे. काही बिनडोक सल्लागार काहीतरी सल्ले देतात आणि पुढचे लोक चुकीची माहिती पसरवतात असे चुकीची माहिती पसरवण्यावर कायदेशीर कारवाई बरोबर त्यांचा बंदोबस्त झाला पाहिजे असे सांगताना सध्या संगमनेर तालुक्यामध्ये उठ सूट पत्रकार परिषदा घेतल्या जात आहेत. विकास कामे करण्याऐवजी फ्लेक्सचे राजकारण केले जात आहे. तालुक्याच्या हक्काच्या पाण्यासाठी व विजेसाठी आणि तालुक्याची आर्थिक समृद्धी टिकवण्यासाठी आपल्या सगळ्यांना संघर्ष करावा लागणार असल्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.**

# तुम्ही तारीख सांगा, पुरावे मी घेऊन येतो

## शेतकरी नेते संतोष रोहम यांचे आव्हान

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - माझ्या शेतातील उसाचे एक टिपरू सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याला जाते की नाही आणि दूध संघाला एक थेंब दूध जाते की नाही, याचे सर्व पुरावे घेऊन मी आपल्याला भेटायला तयार आहे. आपण तारीख सांगा. पत्रकारांच्या उपस्थितीत सर्व कागदपत्रे घेऊन येतो. असे आव्हान शेतकरी संघटनेचे नेते संतोष रोहम यांनी कारखाना अध्यक्षांना दिले.

यासंदर्भात संतोष रोहम यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पिंपरणे शिवारात माझी स्वतःची वडिलोपार्जित शेती असून, यावर्षी त्यांनी शेतातील तीन एकर क्षेत्रावर ऊस लागवड केली आहे. त्यांच्या उसाची नोंद थोरात साखर कारखान्याकडे आहे किंवा नाही, याची कारखान्याच्या कर्मचाऱ्यां मार्फत खात्री करावी आणि त्या नंतरच आपल्यावर टीका करावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

आपण पत्रकार परिषद घेऊन साखर कारखान्याच्या वार्षिक अहवालाच्या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित केले होते. लोकशाही आणि संविधानाच्या चौकटीत विचारलेल्या या प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित होते. मात्र, त्या प्रश्नांना उत्तरे देण्याऐवजी संबंधितांनी आपल्यावर वैयक्तिक पातळीवर टीका केल्याचा आरोप रोहम यांनी केला आहे.

कारखान्याच्या कारभाराबाबत प्रश्न विचारण्याचा मला शंभर टक्के अधिकार आहे, असे ठणकावून सांगत रोहम म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा वारसा आपल्या कुटुंबाला लाभला आहे. आपले आजोबा पी. जे. रोहम हे आमदार होते. त्यामुळे आपल्या कुटुंबाला राजकीय वारसा लाभला आहे. मात्र, आपण आपल्या चारित्र्याला जपणारा कार्यकर्ता असून, आपल्यावर वाळू-मुरूम वाहतुकीचे आरोप करण्यात आले आहेत. मी वाळू-मुरूम वाहून नेल्याचा एक तरी पुरावा द्या. तो पुरावा खरा ठरला तर हजारो लोकांसमोर लोटांगण घालून माफी मागेन, असे आव्हानही रोहम यांनी दिले. यावर्षी शेतकरी विविध अडचणींना सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर कारखाना प्रशासनासमोर आपण ऊस उत्पादक सभासदांना दिवाळीच्या काळात ५० किलो साखर द्यावी, कारखान्याचे सभासदत्व संपलेल्या सभासदांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला वारस सभासद म्हणून घ्यावे आणि सलग तीन वर्षे कारखान्याला ऊस घालणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सभासदत्व देणार की नाही, याबाबत कारखाना प्रशासनाने भूमिका स्पष्ट करावी, असे हे प्रश्न विचारले होते. मात्र त्याचे उत्तर मिळाले नाही. तसेच एवढ्या मोठ्या नेत्याला अशा प्रकारची टीका करणे अजिबात शोभत नाही, असे रोहम यांनी म्हटले आहे. शेतकरी, शोषित आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी आपण आवाज उठवत असून, ही भूमिका कोणत्याही व्यक्तीविरोधात नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. संविधान आणि लोकशाही मानत असाल, तर संविधानाच्या चौकटीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. प्रश्न विचारणे हा सभासद तसेच सर्वसामान्य शेतकऱ्यांचा अधिकार आहे, असे संतोष रोहम यांनी ठामपणे सांगितले.

# नीला विखे पाटील यांची स्वीडनच्या संसदेत ऐतिहासिक एन्ट्री

युवावार्ता (प्रतिनिधी)





शिर्डी - आमच्या कुटुंबातील एक सदस्य एवढ्या मोठ्या पदावर निवडून जाणे ही अत्यंत गौरवास्पद बाब असून, या यशाचा आनंद आमच्या कुटुंबाबरोबरच संपूर्ण लोणी ग्रामस्थांनाही आहे. तिथल्या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेत नीला विखे पाटील यांनी दिलेल्या निरंतर योगदानाचेच हे मोठं यश आहे, अशी सार्थ आणि आनंदाची प्रतिक्रिया जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील नामांकित विखे पाटील घराण्यातील नीला विखे पाटील यांची स्वीडनच्या संसदेत (रिक्सडॅग) खासदार म्हणून ऐतिहासिक निवड झाली असून, या पार्श्वभूमीवर त्यांनी संपूर्ण कुटुंबाच्या वतीनं हा आनंद व्यक्त केला.

माध्यमांशी बोलताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, नीला विखे पाटील यांच्या निवडीचे वृत्त ऐकून आमच्या परिवाराला मनस्वी आनंद झाला आहे. पहिल्यापासूनच तेथील व्यवस्थेमध्ये त्यांनी चांगल्या पद्धतीने सक्रिय राहून दिलेले योगदान खूप महत्त्वपूर्ण राहिले आहे. दिवंगत खासदार बाळासाहेब विखे पाटील यांचा प्रभाव नीला विखे यांच्या कार्यपद्धतीमध्ये प्रकर्षानं दिसून येतो. स्टॉकहोम महापालिकेत नीला विखे नगरसेविका म्हणूनही निवडून आल्या होत्या.

मंत्री विखे पाटील यांनी पुढे म्हटलं, नीला विखे पाटील यांनी बालकल्याण आणि पर्यावरणाच्या क्षेत्रातही स्वीडनमध्ये केलेलं काम अत्यंत मार्गदर्शक ठरलं आहे. यापूर्वी त्यांनी स्वीडनच्या पंतप्रधान कार्यालयात माजी पंतप्रधान स्टीफन लोफवेन यांच्या कार्यकाळात वित्त, कर आणि गृहनिर्माण विषयांवर राजकीय सल्लागार म्हणून काम पाहिलं आहे. त्यांनी केलेल्या याच कामाची पावती या ऐतिहासिक यशामध्ये मिळाली असून, तेथील नागरिकांच्या अपेक्षा त्यांच्याकडून पूर्ण व्हाव्यात, याकरिता मी त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

स्वीडनमध्ये नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत स्टॉकहोम सिटी मतदारसंघातून पर्यावरणवादी 'ग्रीन पार्टी'च्या तिकिटावर विखे घराण्याची ही कन्या विजयी झाली आहे. आशियातील पहिल्या सहकारी साखर कारखान्याचे जनक पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या वारशापासून सुरू झालेली ही राजकीय परंपरा आता आंतरराष्ट्रीय पटलावर पोहोचल्यानं महाराष्ट्रात, विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यात मोठं आनंदाचं वातावरण निर्माण झालं आहे.

नीला विखे पाटील या ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. अशोक विखे पाटील यांच्या कन्या, महाराष्ट्राचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुतणी आणि माजी केंद्रीय मंत्री दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांच्या नात आहेत. नीला यांचा जन्म स्वीडनमध्ये झाला असला तरी त्यांच्या बालपणातील काही वर्षे नगर आणि लोणी येथे गेली आहेत. त्यांनी 'गोथेनबर्ग स्कूल ऑफ बिझनेस, इकॉनॉमिक्स अँड लॉ' येथून पदवी आणि एमबीए पूर्ण केलं असून, माद्रिदच्या 'कॉम्प्लुटेन्स' विद्यापीठातूनही त्यांनी उच्च शिक्षण घेतलं आहे. त्या गेल्या दोन दशकाहून अधिक काळापासून ग्रीन पार्टीशी जोडलेल्या आहेत.

## दिनविशेष

१९८०: इराण-इराक युद्ध — इराकने इराणवर हल्ला करून युद्धाची सुरवात.
१९६५: दुसरे काश्मीर युद्ध — संयुक्त राष्ट्रसंघाच्या युद्धबंदी आदेशानंतर भारत पाकिस्तान मधील दुसरे काश्मीर युद्ध थांबले.
१९४१: युक्रेन होलोकॉस्ट — जर्मन युक्रेनमधील विनितसिया येथे किमान ६ हजार ज्यूं लोकांची हत्या केली.
१९३९: दुसरे महायुद्ध — पोलंडवरील यशस्वी आक्रमण साजरे करण्यासाठी संयुक्त जर्मन-सोव्हिएत लष्करी परेड आयोजित करण्यात आली.
१९३१: — नेपाळचे राजपुत्र हेमसमशेर राणा आणि वीर सावरकर यांची भेट.
१९१४: — जर्मन पाणबुडीने ब्रिटीश क्रूझर जहाजे बुडवले, त्यात किमान १५०० दर्यावर्दी लोकांचे निधन.
१८९१: फिनलंड — देशातील पहिला जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित झाला
१८८८: द नॅशनल जिऑग्रॉफिक — मासिकाचा पहिला अंक प्रकाशित.

## जन्म

१९६४: नरेंदर थापा — भारतीय फुटबॉलपटू (निधन: ५ ऑगस्ट २०२२ )
१९२८: विठ्ठलराव गाडगीळ — भारतीय राजकारणी (निधन: २००१ )
१९२३: रामकृष्ण बजाज — ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व उद्योगपती
१९२२: चेन निंग यांग — चिनी भौतिकशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार
१९१६: इन तम — कंबोडियाचे जनरल आणि राजकारणी, कंबोडियाचे २६ वे पंतप्रधान (निधन: १ एप्रिल २००६ )
१९१५: अनंत माने — मराठी चित्रपट दिग्दर्शक (निधन: ९ मे १९९५ )
१९०९: विडंबनकार दत्तू बांदेकर — विनोदी लेखक (निधन: ३ ऑक्टोबर १९५९ )
१८८७: कर्मवीर भाऊराव पाटील — भारतीय शिक्षणतज्ज्ञ — पद्म भूषण (निधन: ९ मे १९५९ )
१८८५: बेन चीफली — ऑस्ट्रेलियाचे १६वे पंतप्रधान
१८७८: योशिदा शिगेरू — जपानचे पंतप्रधान
१८७६: आंद्रे तार्द्यू — फ्रांसचे पंतप्रधान

## मृत्यू

२००७: खेळाडू बोडिन्हो — ब्राझिलचे फुटबॉल
२००२: विल्यम रोसेनबर्ग — डंकिन डोनट्सचे स्थापक (जन्म: १० जून १९१६ )
१९९४: जी. एन. जोशी — भावगीतगायक व संगीतकार (जन्म: ६ एप्रिल १९०९ )
१९९१: दुर्गा खोटे — मराठी अभिनेत्री (जन्म: १४ जानेवारी १९०५ )
१९७०: शरदेंन्दू बंदोपाध्याय — बंगाली लेखक (जन्म: ३० ऑगस्ट १८९९ )
१९६९: ऍडोल्फो लोपे मटियोस — मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष
१९६५: ओथमर अम्मांन — जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिजचे रचनाकार (जन्म: २६ मार्च १८७९ )
१९५६: विल्हेल्म ऑस्टवाल्ड — नोबेल पारितोषिक विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २ सप्टेंबर १८५३ )
१९५२: कार्लो जुहो स्टॅहल्बर्ग — फिनलंड देशाचे पहिले अध्यक्ष (जन्म: २८ जानेवारी १८६५ )२०२२: पाल सिंग पुरेवाल — भारतीय-कॅनेडियन विद्वान
२०२०: आशालता वाबगावकर — भारतीय चित्रपट अभिनेत्री (जन्म: २ जुलै १९४१ )
२०११: अरिसिदास परेरा — केप व्हर्दे देशाचे पहिले अध्यक्ष (जन्म: १७ नोव्हेंबर १९२३ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२२ सप्टेंबर**

# काश्मीरसाठी पेटले युद्ध; भारत-पाकिस्तान संघर्षाला संयुक्त राष्ट्रांच्या युद्धबंदीने लागला पूर्णविराम



१९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धाला भारतीय उपखंडाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानले जाते. काश्मीरच्या प्रश्नावरून दोन्ही देशांमध्ये वाढलेल्या तणावाचे रूपांतर या युद्धात झाले. हे युद्ध प्रामुख्याने जम्मू-काश्मीरच्या नियंत्रणावरून झाले असले, तरी त्याचा विस्तार पंजाब आणि राजस्थानच्या सीमांपर्यंत झाला. भारतीय लष्कराने या संघर्षात दाखवलेल्या शौर्यामुळे हे युद्ध देशाच्या लष्करी इतिहासात विशेष महत्त्वाचे ठरले.१९६५ च्या सुरुवातीला कच्छच्या रणातील सीमावादामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणाव वाढला. त्यानंतर पाकिस्तानने जम्मू-काश्मीरमध्ये 'ऑपरेशन जिब्राल्टर' अंतर्गत घुसखोर पाठवून तेथील परिस्थिती अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. भारताने या घुसखोरीला प्रत्युत्तर दिले. परिस्थिती अधिक चिघळत गेल्यानंतर ऑगस्ट-सप्टेंबर १९६५ मध्ये दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर लढाई सुरू झाली.भारताने केवळ काश्मीरमध्येच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय सीमाही ओलांडून पाकिस्तानच्या दिशेने लष्करी कारवाई केली. पंजाबच्या आघाडीवर झालेल्या संघर्षात मोठ्या प्रमाणावर रणगाडे आणि तोफखान्याचा वापर झाला. असाल उत्तरच्या लढाईत भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या मोठ्या संख्येने रणगाड्यांना रोखण्यात यश मिळवले. या युद्धात भारतीय हवाई दल आणि नौदलानेही महत्त्वाची भूमिका बजावली.युद्धादरम्यान दोन्ही देशांना मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ आणि लष्करी साधनसामग्रीचे नुकसान सहन करावे लागले. मात्र, युद्धाचा स्पष्ट आणि निर्णायक निकाल लागला नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावरही या संघर्षाबाबत चिंता वाढत होती. अखेर संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेने २२ सप्टेंबर १९६५ रोजी युद्धबंदी लागू करण्याचे आवाहन केले आणि भारत-पाकिस्तानने युद्ध थांबवले.युद्धबंदी झाल्यानंतरही दोन्ही देशांमधील तणाव कायम होता. पुढे सोव्हिएत संघाच्या मध्यस्थीने भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष अयुब खान यांच्यात ताश्कंद येथे चर्चा झाली. १० जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दोन्ही देशांनी युद्धापूर्वीच्या स्थितीकडे परतण्याचे आणि शांततापूर्ण मार्गाने प्रश्न सोडवण्याचे मान्य केले.ताश्कंद करारानंतर अवघ्या काही तासांतच, ११ जानेवारी १९६६ रोजी लालबहादूर शास्त्री यांचे ताश्कंद येथे निधन झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने १९६५ च्या युद्धात ठाम भूमिका घेतली होती.१९६५ चे युद्ध भारतासाठी केवळ लष्करी संघर्ष नव्हते; ते राष्ट्रीय एकात्मता, सैनिकांचे शौर्य आणि देशाच्या संरक्षणक्षमतेची कसोटी होती. या युद्धाने भारताला संरक्षण क्षेत्र अधिक मजबूत करण्याची गरज जाणवून दिली. भारतीय जवानांनी दाखवलेल्या धैर्यामुळे १९६५ चे युद्ध भारतीय इतिहासात शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक म्हणून आजही स्मरणात आहे.

# नरेंद्र थापा : भारतीय फुटबॉलचा दमदार स्ट्रायकर

**जन्मदिन विशेष**

नरेंद्र थापा हे १९८०च्या दशकातील भारतीय फुटबॉलमधील प्रतिभावान आणि आक्रमक स्ट्रायकर म्हणून ओळखले जात होते. त्यांचा जन्म २२ सप्टेंबर १९६४ रोजी झाला. पंजाबशी त्यांचा संबंध होता आणि पुढे फुटबॉलच्या कारकिर्दीसाठी ते कोलकात्यात दाखल झाले. वेग, कौशल्य, चेंडूवरील नियंत्रण आणि गोल करण्याची क्षमता यामुळे त्यांनी भारतीय फुटबॉलमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.लहानपणापासूनच नरेंद्र थापा यांना फुटबॉलची विशेष आवड होती. १९८० मध्ये त्यांनी इंडोनेशियातील जकार्ता येथे झालेल्या आशियाई शालेय स्पर्धेत सहभाग घेतला. त्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमधील त्यांच्या कामगिरीने निवडकर्त्यांचे लक्ष वेधून घेतले. पंजाबमधील JCT क्लबपासून त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीला सुरुवात झाली. पुढे त्यांनी मुंबईतील Mafatlal क्लबमध्येही खेळ केला.१९८३ मध्ये नरेंद्र थापा यांची भारतीय राष्ट्रीय संघात निवड झाली. नेहरू कपमध्ये चीनविरुद्ध त्यांनी भारताकडून आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. पुढील काळात ते भारतीय संघातील महत्त्वाचे आक्रमक खेळाडू बनले. त्यांनी भारतासाठी २९ अधिकृत आंतरराष्ट्रीय सामने खेळून तीन गोल केले.त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात संस्मरणीय क्षणांपैकी एक म्हणजे १९८४ मधील ग्रेट वॉल कपमध्ये अल्जेरियाविरुद्ध केलेला विजयी गोल. भारताने हा सामना १-० असा जिंकला. विशेष म्हणजे त्या वेळी अल्जेरियाच्या संघात १९८२ च्या विश्वचषकात खेळलेले अनेक खेळाडू होते. त्यामुळे थापांच्या त्या गोलचे महत्त्व आणखी वाढते.१९८४ मध्ये ते एएफसी आशिया कपसाठी भारतीय संघाचा भाग होते. त्या स्पर्धेत भारताने सिंगापूर, यूएई, इराण आणि चीनविरुद्ध सामने खेळले. नरेंद्र थापा हे त्या ऐतिहासिक भारतीय संघातील महत्त्वाचे खेळाडू होते.क्लब फुटबॉलमध्येही त्यांची कारकीर्द उल्लेखनीय होती. त्यांनी Mohammedan Sporting आणि Mohun Bagan यांसारख्या कोलकात्यातील प्रतिष्ठित क्लबचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या कारकिर्दीत IFA Shield, Rovers Cup आणि Federation Cup यांसारख्या महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवणाऱ्या संघांचा ते भाग होते.



पश्चिम बंगालकडून खेळताना त्यांनी १९८६ मध्ये संतोष ट्रॉफी जिंकली.फुटबॉलनंतरही थापा यांनी खेळाशी असलेले नाते कायम ठेवले. त्यांनी Food Corporation of India मध्ये काम केले आणि पुढील काळात फुटबॉलच्या विकासासाठीही योगदान दिले. त्यांच्या नावाने यमुनानगरमध्ये Narender Thapa Football Academy कार्यरत असून युवा खेळाडूंना प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देण्याचे काम केले जाते.५ ऑगस्ट २०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने नरेंद्र थापा यांचे निधन झाले. ते ५७ वर्षांचे होते. भारतीय फुटबॉलमधील त्यांच्या योगदानाची दखल घेत अखिल भारतीय फुटबॉल महासंघानेही त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.नरेंद्र थापा यांचा प्रवास हा केवळ एका फुटबॉलपटूची कहाणी नाही, तर प्रतिभा, मेहनत, शिस्त आणि देशासाठी खेळण्याची जिद्द यांचे उदाहरण आहे.




दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## युवावार्ता कार्यालयात मान्यवरांकडून गणेशाची आरती



संगमनेर - दैनिक युवावार्ता कार्यालयामध्ये विराजमान असलेल्या गणरायाची आरती संगमनेर येथील ह.भ.प दत्तात्रय महाराज भोर व युनियन बँक संगमनेर शाखेचे मॅनेजर संदीप सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी याप्रसंगी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे व संपादक सौ. सुशीला किसन हासे यांनी मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी युवावार्ताचे संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे यांच्यासह युवावार्ता परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करा- माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -राज्यामध्ये अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे पाण्याअभावी पिके जळून चालली आहे. संपूर्ण शेतकरी हवालदिल झाला असून सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहताना पंचनामे यांचा कोणताही फार्स न करता सरसकट दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी काँग्रेस पक्षाचे नेते माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली असून संगमनेर मार्केट कमिटीचे काम सर्वोत्तम असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले आहे. वडगाव पान येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार येथे विविध विकास कामांचा शुभारंभ शेतकरी मेळावा व वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी सभापती शंकर पाटील खेमनर हे होते तर व्यासपीठावर मा आ डॉ सुधीर तांबे, ड माधवराव कानवडे, डॉ. जयश्रीताई थोरात बाबासाहेब ओहोळ, उपसभापती गीताराम गायकवाड, संचालक कैलास पानसरे, मनीष गोपाळे, सुरेश कान्होरे, सतीश खताळ, सुधाकर ताजने, विजय सातपुते, अनिल घुगे, मार्केट कमिटीचे सचिव सतीश गुंजाळ यांच्यासह अमृत उद्योग समूहातील विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते शेतकरी सुविधा केंद्र, अंतर्गत डांबरी रस्ते, लिलाव शेड नंबर १व २ चे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की राज्यभरामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. आता पंचनामे कुठले करता, असे काही न करता राज्यभरात सरसकट दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना भरघोस मदत करावी अशी मागणी केली केली. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बाजार समितीची संकल्पना सुरू केली आणि ती देशभर गेली. बाजार समिती मोडीत काढण्यासाठी केंद्र सरकारने तीन काळे कायदे काढले होते या विरोधात हरियाणा व पंजाब मधील शेतकऱ्यांनी मोठे आंदोलन छेडले त्यात ७०० शेतकऱ्यांना बलिदान द्यावे लागले त्यानंतर त्या आंदोलन मागे गेले. आपण महसूल मंत्री पदाच्या काळामध्ये या ठिकाणी उपबाजार करता १६ एकर जमीन मिळवली त्या माध्यमातून अत्यंत सुंदर परिसर येथे झाला आहे. खुली कांदा विक्री त्याचप्रमाणे भाजीपाल्यासाठी मोठे मार्केट या ठिकाणी आहे. निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले. आता विजेचा खेळ खंडोबा सुरू आहे. पाणी गेले तर तालुका उध्वस्त होईल म्हणून आता आपण तयार राहिले पाहिजे. या प्रशासनावर धाक ठेवला पाहिजे असे सांगून २२ तारखेच्या मोर्चामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. तर मा आमदार डॉ तांबे म्हणाले की शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. ही रास्त मागणी शेतकऱ्यांची सरकारकडे आहे आपल्या बाजार समितीने शेतकऱ्यांना अत्यंत चांगल्या सुविधा दिल्या असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याला पाण्याचा हक्क मिळाला. राज्यात संगमनेर तालुक्याला वैभव मिळाले. या बाबी पुढच्या तरुण पिढीला सर्वांनी सांगितल्या पाहिजे असे ते म्हणाले. तर सभापती शंकर पा खेमनर म्हणाली की, बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व्यापारी हमाल, मापाडी या सर्वांना चांगल्या सुविधा दिले आहेत. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या दूरदृष्टी मधून वडगाव पान येथे हा उपबाजार सुरू केला असून आगामी काळामध्ये आंबी खालसा येथे १५ एकर जागेवर अद्यावत उपबाजार सुरू केला जाणार आहे.

### तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने रेल्वे अत्यंत महत्त्वाची

**निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले. त्याचप्रमाणे तालुक्याच्या शेजारी विमानतळ निर्माण केले. हे पुढील अनेक पिढ्यांसाठी उपयुक्त ठरणारे आहे. नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्गे मार्केट कमिटी उपबाजार पासून जवळून जात होती. संगमनेर तालुक्याच्या विकासाला गती मिळणार होती. जमीन अधिग्रहित करून अनेक शेतकऱ्यांना पैसेही दिले होते. या रेल्वे मार्गामुळे आपला युवक व शेतमाल देशभरात जाऊ शकला असता मात्र कोणीतरी त्यामध्ये खुट्या ठोकल्या आणि हा मार्ग बदलला. आणि संगमनेर चा नवीन लोकप्रतिनिधी रेल्वे मार्ग बदलण्यासाठी ती काय नेहरू गार्डन मधील रेल्वे आहे का असे बालिशपणे म्हणतो. तालुक्याचे मूलभूत प्रश्न आणि रेल्वे बाबत एक शब्दही बोलत नाही. हे अत्यंत दुर्दैवाची आहे. ते बोलत नाही कोणतीही ठोस भूमिका घेत नाही म्हणून आता आपल्यालाच भूमिका घ्यावी लागणार आहे असे सांगताना तालुक्याचे वैभव मोठ्या कष्टातून उभे केले असून टिकवण्यासाठी आपल्या सर्वांना संघर्ष करावा लागेल असे सांगितले.**

## निमगावजाळी शिवारात आढळला मृतदेह

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

तालुक्यातील निमगावजाळी शिवारातील तामखडा डोंगराच्या पायथ्याशी अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाच्या एका अनोळखी इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. हा मृतदेह काही दिवसांपूर्वीचा असून मयताची ओळख पटवण्याचे मोठे आव्हान आश्वी पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २०) सकाळी नऊ वाजेच्या सुमारास तामखडा डोंगराच्या पायथ्याशी एका झाडाला अनोळखी इसम गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. वनरक्षक बाळू डेंगळे यांनी तात्काळ पोलीस पाटील दिलीप डेंगळे यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलीस पाटलांनी आश्वी पोलीस ठाण्याला घटनेबाबत खबर दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांनी पथकासह तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून पंचनामा केला. मृतदेह कुजण्यास सुरवात झाल्याने या व्यक्तीने ५ ते ६ दिवसांपूर्वी गळफास घेतला असा प्राथमिक असावा, अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यानंतर मृतदेह पुढील कारवाईसाठी लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला.

दरम्यान, मयत व्यक्तीचे केस मानेपर्यंत वाढलेले आहे. त्यांच्या अंगात आकाशी रंगाचा टी-शर्ट आणि निळ्या रंगाची पॅन्ट आहे. तसेच घटनास्थळी मयताच्या चपला देखील सापडल्या आहेत. तर, मयताच्या झडतीदरम्यान ओळख पटेल असा कोणताही पुरावा किंवा कागदपत्रे पोलिसांच्या हाती लागलेली नाहीत. या वर्णनाची किंवा वयाची व्यक्ती बेपत्ता असल्यास अथवा या व्यक्तीबाबत काही माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ आश्वी पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक शिरसाठ यांनी केले आहे.

# मेंढवणमधील स्टील चोरीप्रकरणी ‘गौडबंगाल’?

### तालुका पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशीची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील मेंढवण येथे सुरू असलेल्या रस्त्याच्या कामासाठी आणून ठेवण्यात आलेल्या स्टीलची चोरी झाल्याच्या प्रकरणाने आता वेगळेच वळण घेतले आहे. चोरीच्या घटनेनंतर संशयित आरोपी तसेच चोरीचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली असतानाच, त्यानंतर संबंधितांवर नेमकी कोणती कारवाई झाली, याबाबत मात्र स्पष्टता नसल्याने संगमनेर तालुका पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



एआय फोटो

रस्त्याच्या कामासाठी आणून ठेवण्यात आलेले स्टील चोरीला गेल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधितांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतल्याची तसेच चोरीचा मुद्देमाल हस्तगत केल्याची चर्चा आहे. मात्र, या कारवाईनंतर गुन्हा दाखल करण्यात आला का? मुद्देमाल किती प्रमाणात जप्त करण्यात आला? संशयितांवर कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली? तसेच त्यांना सोडण्यात आले असल्यास त्यामागील कारण काय? असे अनेक प्रश्न सध्या उपस्थित होत आहेत. या प्रकरणाची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी संगमनेर तालुका पोलिसांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, संबंधितांकडून स्पष्ट माहिती उपलब्ध न झाल्याने प्रकरणातील संभ्रम आणखी वाढला आहे. पोलिसांनी संशयितांना ताब्यात घेतले होते आणि चोरीचा मुद्देमालही हस्तगत केला असल्यास, पुढील कायदेशीर प्रक्रिया पारदर्शकपणे का स्पष्ट करण्यात आली नाही, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, रस्ते कामासाठी लागणारे साहित्य चोरीला जाणे ही गंभीर बाब असून, या घटनेमुळे सार्वजनिक कामांच्या ठिकाणी साहित्याच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. चोरीचा मुद्देमाल खरोखरच हस्तगत झाला असेल, तर त्याची अधिकृत नोंद आणि पंचनामा झाला आहे का, याचीही चौकशी होणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रकरणाची संगमनेर तालुका पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन स्वतंत्रपणे चौकशी करावी. संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर झालेल्या कारवाईचा तपशील तसेच चोरीच्या मुद्देमालाबाबतची वस्तुस्थिती जनतेसमोर स्पष्ट करावी. दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांतून होत आहे.


नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165










दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25